# वाई पोलीस स्टेशन

सोनगिरवाडी, तालुका वाई, जिल्हा-सातारा

E-mail : waips.satara@mahapolice.gov.in


दिनांक :- २३/०२/२०२६

## प्रेसनोट दिनांक २३/०२/२०२६

**बहुचर्चित रोहित्रामधील (डिपी) ताब्यांचे तारेची चोरी करणारे ०६ आरोपी वाई गुन्हेप्रकटीकरण विभागाने अटक करुन त्यांचेकडुन १७ लाख रुपये किंमतीचा मुद्देमाल केला हस्तगत.**

वाई पोलीस ठाण्याच्या हद्दीमध्ये गेले काही दिवसापासुन रोहित्राचे (डिपी) नुकसान करुन त्यामधील ताब्यांच्या तारेच्या चोरीच्या घटना मोठ्या प्रमाणावर घडत होत्या.सदर घडत असलेल्या गुन्ह्याचा तपास करुन आरोपींचा शोध घेण्याच्या सुचना पोलीस अधीक्षक श्री तुषार दोषी साहेब यांनी वाई पोलीस निरीक्षक यांना दिल्या असता वाई पोलीस ठाणेकडील अधिकारी व अंमलदार यांनी तांत्रिक विश्लेषण तसेच खब-याचे आधारे सदर गुन्ह्यांचा शोध सुरु केला सदरचे संपुर्ण रोहित्र हे धोम कॅनॉलच्या कडेला असल्याने कॅनॉलच्या कडेला सीसीटीव्ही नसल्याने संपुर्ण तपासात अडचणी येत होत्या.वाई पोलीस ठाणेकडील तपासपथकातील अंमलदार विशाल शिंदे,हेमंत शिंदे यांचे तांत्रिक विश्लेषण व अंमलदार विक्रम धोत्रे,श्रावण राठोड यांचे बातमीदारांमार्फत आरोपींचा शोध घेतला असता,हे यातील ०३ आरोपी हे फलटण येथील असुन,त्यांना मदत करणारे ०३ आरोपी हे वाई येथील असल्याचे तपासात निष्पन्न झाले.त्यानुसार फलटण व वाई येथील एकुण ०६ आरोपी यांना अटक करुन त्यांचेकडे अधिकचा तपास करुन आरोपी यांनी चोरी केलेला मुद्देमालापैकी ३०० किलो ताब्यांची तार गुन्हयात वापरलेली ०२ दुचाकी व ०१ चारकचाकी वाहन तसेच आरोपींचे ०५ मोबाईल असा एकुण १७,००,०००/-लाख रुपये किंमतीचा मुद्देमाल जप्त करण्यात आलेला आहे. गुन्ह्यातील आरोपीची नावे पुढीलप्रमाणे

१) मुकेश माणिक जाधव वय ४५ रा.मलठण,फलटण जि.सातारा
२) अनिकेत सुभाष बनसोडे वय २२ रा.मलठण,फलटण जि.सातारा
३) अर्जुन राजु जाधव वय २० रा.मलठण,फलटण जि.सातारा
४) रोहन लाखन घाडगे वय २४ रा यशवंतनगर वाई जि.सातारा
५) विजय बाबुराव शिंदे वय ३६ रा यशवंतनगर वाई जि.सातारा
६) मनोज नामदेव घाडगे वय ४० रा यशवंतनगर वाई जि.सातारा

यातील आरोपी क्रमांक १ ते ३ हे सराईत गुन्हेगार असुन,आरोपी क्रमांक २ व ३ हे फलटण शहर पोलीस ठाणे येथुन सातारा जिल्ह्यामधुन तडीपार करण्यात आलेले आहेत.

Scanned with OKEN Scanner

वरील अटक आरोपी यांचेकडुन वाई पोलीस ठाणेकडील उघड करण्यात आलेले गुन्हे पुढीलप्रमाणे

| अ.क्र | पोलीस ठाणे | गु.र.नं | कलम |
|---|---|---|---|
| १ | वाई पो.स्टे | २२३/२०२५ | भा.न्या.स.३०३(२),३२४(४),भा.विद्युत अधिनियम कलम १३६ |
| २ | वाई पो.स्टे | २८६/२०२५ | भा.न्या.स.३०३(२),३२४(४),भा.विद्युत अधिनियम कलम १३६ |
| ३ | वाई पो.स्टे | ३०३/२०२५ | भा.न्या.स.३०३(२),३२४(४),भा.विद्युत अधिनियम कलम १३६ |
| ४ | वाई पो.स्टे | ०३/२०२६ | भा.न्या.स.३०३(२),३२४(४),भा.विद्युत अधिनियम कलम १३६ |
| ५ | वाई पो.स्टे | ०६/२०२६ | भा.न्या.स.३०३(२),३२४(४),भा.विद्युत अधिनियम कलम १३६ |
| ६ | वाई पो.स्टे | २१/२०२६ | भा.न्या.स.३०३(२),३२४(४),भा.विद्युत अधिनियम कलम १३६ |
| ७ | वाई पो.स्टे | ३९/२०२६ | भा.न्या.स.३०३(२),३२४(४),भा.विद्युत अधिनियम कलम १३६ |

सदरची कामगिरी मा.श्री तुषार दोषी पोलीस अधीक्षक सो सातारा,श्रीमती वैशाली कडुकर अप्पर पोलीस अधीक्षक सो सातारा,श्री.सुनील साळुंखे उपविभागीय पोलीस अधिकारी वाई विभाग वाई यांचे मार्गदर्शनाखाली श्री जितेंद्र शहाणे पोलीस निरीक्षक वाई पोलीस ठाणे,श्री.अमोल गवळी सहा.पोलीस निरीक्षक वाई तपासपथकाचे श्री.सुधीर वाळुंज पोलीस उपनिरीक्षक पो.हवा अजित जाधव,पोलीस अंमलदार नितीन कदम,हेमंत शिंदे,विक्रम धोत्रे,श्रावण राठोड,विशाल शिंदे मारोती लोलापोड,पोलीस पाटील संदेश वैराट,जनार्दन गोळे यांचे पथकाने केली आहे.मा.पोलीस अधीक्षक सो व अप्पर पोलीस अधीक्षक सो यांनी वाई गुन्हेप्रकटीकरण विभागाचे अभिनंदन केलेले आहे.

(मा.पोलीस अधीक्षक सो सातारा यांचे मान्यतेने)

प्रति,

सर्व संपादक,सातारा.

Scanned with OKEN Scanner